# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


जा.क्र : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी/२०१९/ 46 दिनांक : 02 JAN 2020

प्रति,
प्राचार्य/संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत येणाऱ्या
पुणे विभागातील संस्था,

**विषय : संस्थांचे महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईनरित्या बदल करण्यात आलेले बँक तपशील मंजुर करणेबाबत.**

संदर्भ :- संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र
क्रमांक : १८/तंशिसं/खातेबदल/डीबीटी/२०१९/५७३ दिनांक २३/१२/२०१९.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सर्व संबंधीत संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, महाडीबीटी पोर्टलवर राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांमध्ये संस्थांचा लाभ संस्थांना मिळण्यासाठी प्राचार्य यांचेकडून ऑनलाईन संस्थेच्या प्रोफाईलमध्ये बँक खात्याची संपूर्ण माहिती भरण्यात येते व त्यानुसार संबंधीत बँक खात्यामध्ये शिष्यवृत्तीची संस्थेच्या लाभाची रक्कम पाठविण्यात येते.

तसेच बँक तपशीलामध्ये ऑनलाईन बदल करण्याचा अधिकार देखील संस्थेच्या प्राचार्यांना त्याच्या लॉगीन मार्फत मागे घेण्यात आलेला आहे. सदर डीबीटी पोर्टलवर संस्थेच्या प्रोफाईलमध्ये ऑनलाईन भरलेल्या नवीन बँक तपशील मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार डीआयटीकडून तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना ऑनलाईनरित्या देण्यात आलेले आहेत.

**ज्या संस्थांना बँक खात्यामध्ये बदल करावयाचे असतील अशा संस्थांनी** डीबीटी पोर्टलवर प्रथम संस्थेच्या लॉगीनमधून प्रोफाईलमध्ये ऑनलाईनरित्या नवीन बँक तपशील भरुन मंजूर करण्यासाठी संस्थेच्या लेटरहेडवर खालीलप्रमाणे तपशील या विभागीय कार्यालयास जमा करावा. त्यानंतर या विभागीय कार्यालयाकडून शिफारशीसह प्रस्ताव संचालनालयास पाठविण्यात येईल.

संस्थांच्या DBT पोर्टलवर पूर्वीच्या बँक खात्याचा तपशील

| अ.क्र. | संस्थेचे नांव | बँकेचे नांव | आय.एफ.एस.सी.कोड | बँकेचा खाते क्र. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

मंजूरीसाठी संस्थांकडून DBT पोर्टलवर ऑनलाईनरित्या बदल केलेल्या बँक खात्याचा तपशिल

| अ.क्र. | संस्थेचे नांव | बँकेचे नांव | आय.एफ.एस.सी.कोड | बँकेचा खाते क्र. | पुर्वीच्या खात्यात बदल करण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी- २२६१७९६९, फॅक्स - २२६९०००७
E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


Flc

ई-मेलद्वारे/स्पीड पोस्टद्वारे

क्रमांक : १८/तशिसं/खातेबदल/डीबीटी/२०१९/ ५०३
दिनांक : २८/१२/२०१९

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय : संस्थांचे महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईनरित्या बदल करण्यात आलेले बँक तपशिल मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र राज्यांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना पूर्वापारपध्दतीनुसार विविध विभागांमार्फत राबविण्यात येत होत्या. सदर योजनांमध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने व योजनांचा लाभ लाभार्थ्यांच्या थेट खात्यामध्ये जाण्याच्या दृष्टीने केंद्र शासनातर्फे डी.बी.टी. पोर्टल संकल्पना राबविली. त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्य शासनाकडूनही सन २०१८-१९ मध्ये ही संकल्पना राबविण्यात आली.

सन २०१८-१९ पासून महाराष्ट्र राज्य शासनाच्या सर्व योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय (डी.आय.टी.) यांचेकडून, आपले सरकार महाडीबीटी पोर्टल (संकेतस्थळ: https://mahadbtmahait.gov.in ) बनविण्यात आले.

DBT अंतर्गत योजनांचा लाभ संस्था/विद्यार्थ्यांना DBT पोर्टल मार्फत देण्यात येतो. DBT पोर्टलवर संस्थाचा लाभ संस्थांना मिळण्यासाठी प्राचार्य यांच्याकडून संस्थेच्या प्रोफाईल लॉगीनमध्ये बँक खात्याची संपूर्ण माहिती भरण्यात येते. बँक खात्यामध्ये संबंधीत संस्थांची रक्कम DBT पोर्टल मार्फत त्यांच्या खात्यात पाठविण्यात येते. तसेच बँक तपशीलमध्ये ऑनलाईनबाबत बदल करण्याचे अधिकार देखील संस्थांच्या प्राचार्यांना त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये देण्यात आलेला आहे.

तंत्र शिक्षण संचालनालयाअंतर्गत येणाऱ्या ज्या संस्थांकडून पुर्वीच्या बँक तपशिलात बदल करून DBT पोर्टलवर नवीन बँक खात्याचा तपशील भरण्यात आलेला आहे त्या बँक तपशिलात मंजुर/नामंजूर करण्याचे अधिकार डीआयटी कडून या संचालनालयाला ऑनलाईनरित्या देण्यात आलेले आहेत.

. संस्थांना बँक खात्यामध्ये जर बदल करावयाचे असतील तर त्या संस्थांनी आपल्या लॉगींन आयडी चा वापर करून DBT पोर्टलवर ऑनलाइनरित्या बँक तपशिल भरून मंजूर करण्यासाठी संस्थांच्या लेटर हेडवर खालील तक्त्यामध्ये संस्थाच्या पूर्वीच्या बँक खात्याचा तपशिल व मंजूर/नामंजूर करण्यासाठी संस्थाकडून DBT पोर्टल वर ऑनलाइनरित्या बदल केलेल्या बँक खात्याचा तपशिल बदल करायच्या कारणासह संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयार्फत जमा करावे. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय त्यांच्या शिफारशिसह संस्थेचा प्रस्ताव संचालनालयास पाठविल्यानंतर ते मंजूर/नामंजूर हे संचालनालय स्तरावर करण्यात येईल. सर्व विभागीय कार्यालयांनी आपल्या अधिनस्त येणाऱ्या संस्थांना याबाबत तसे कळविण्यात यावे.

संस्थाच्या DBT पोर्टलवर पूर्वीच्या बँक खात्याचा तपशिल

| अ.क्र. | संस्थेचे नांव | बँकेचे नांव | आय.एफ.एस.सी. कोड | बँकेचा खाते क्र. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

मंजूरीसाठी संस्थाकडून DBT पोर्टलवर ऑनलाईनरित्या बदल केलेल्या बँक खात्याचा तपशिल

| अ.क्र. | संस्थेचे नांव | बँकेचे नांव | आय.एफ.एस.सी. कोड | बँकेचा खाते क्र. | पुर्वीच्या खात्यात बदल करण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.